सर्वसामान्यांचे सायं दैनिक
# सांजशक्ती
सोमवार, दिनांक १९ डिसेंबर २००५

# आझाद अली शाह शिक्षण संस्थेतर्फे विविध कार्यक्रम

औरंगाबाद (प्रतिनिधी)- आझाद अली शाह शिक्षण संस्थेद्वारे संचलित खडकेश्वर येथील शायनिंग स्टार इंग्रजी प्राथमिक शाळा महालक्ष्मी विश्वनाथन विद्यालय (मराठी माध्यम) या दोन्ही शाळेत केंद्रीय कृषी मंत्री खा. शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्या वतीने विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये फॅन्सी ड्रेस स्पर्धा, कॅन्टी डे व फन फेअर मेला व वृक्षारोपनाचा कार्यक्रम मुख्याध्यापक साजिद पाशा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या उत्साहात व आनंदमय वातावरणात कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन औरंगाबाद जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी एम. ए. खालिक यांच्या हस्ते झाले. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी शिक्षक संघटनेचे प्रदेश अध्यक्ष संजय जाधव पाटील हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष ईसाक पटेल, जिल्हा सरचिटणीस काकासाहेब जगताप, प्रसिध्दी प्रमुख गणेश अवचर, कोषाध्यक्ष अण्णासाहेब दांडगे, शहर उपाध्यक्ष आसिफ खान पठाण, शालेय शिक्षक- पालक समितीचे अध्यक्ष प्रा. संगीता साळवे उपस्थित होते. याशिवाय संस्थेची अध्यक्ष शाह सुरैय्या खान, मुख्याध्यापक साजीद पाशा, शाळेतील सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थी हजर होते.

वृक्षारोपणाच्या स्पर्धेत इंग्रजी माध्यमातून सरफराज पाशु कुरेशी यास पहिले पारितोषिक, मानसी माने हिला दुरे तर पीयूष जाधव याला तिसरे पारितोषिक देण्यात आले. तर मराठी माध्यमाच्या शाळेतून सुबोध साळवे प्रथम, आशिष सोनटक्के द्वितीय तर अजय दाभाडे तृतीय असे बक्षिसांचे मानकरी ठरले.

वृक्षारोपण करून प्रदूषण थांबविणे आपल्या स्वत:साठी किती महत्त्वाचे असते हे पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. सय्यद फैमून यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



खा. शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शायनिंग स्टार शाळेत फॅन्सी स्पर्धा वृक्षारोपण, फन फेअ मेला व कॅन्डीन डे चे उद्घाटन करताना जि.प.चे शिक्षणाधिकारी एम. ए. खालीक दिसत आहे. सोब संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संजय जाधव पाटील, आसिफ खान, सुरैय्या खान, शफीक खान, इरफान शे व शाळेचे मुख्याध्यापक साजिद पाशा आदी.